डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

जा. क्र. बार्टी/ अधि. विभाग/BANRF-२०२१/मुदतवाढ घोषणापत्रक/२०२३-२४/ २८४ दि. २९/५/२३

## BANRF-2021- मुदतवाढ घोषणापत्रक

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF)-२०२१ करीता निवड करण्यात आलेल्या ८६१ विद्यार्थ्यांना दि. २४.०४.२०२३ रोजीच्या घोषणापत्रकानुसार अवॉर्ड लेटर विद्यार्थ्यांच्या ई-मेलवर पाठविण्यात आलेले होते. तसेच दि.०९.०५.२०२३ रोजीचे घोषणापत्रकव्दारे विद्यार्थ्यांनी अधिछात्रवृत्तीची कागदपत्रे ३१ मे, २०२३ रोजीपर्यंत बार्टी कार्यालयास सादर करण्याबाबत सुचित करण्यात आलेले होते.

सद्यस्थितीत अनेक विद्यापीठांना १५ जून २०२३ रोजीपर्यंत उन्हाळी सुट्या लागल्याने विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तींची कागदपत्रे बार्टी कार्यालयास सादर करण्याकरीता अडचणी येत असल्याने विद्यार्थ्यांनी अधिछात्रवृत्तीची कागदपत्रे सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्याअनुषंगाने BANRF-२०२१ च्या अधिछात्रवृत्तीची कागदपत्रे बार्टी कार्यालयास सादर करण्याकरीता दि. ३० जून, २०२३ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे या घोषणापत्रकाव्दारे विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे.

(स्नेहल भोसले)
विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व
प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे.